# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## मराठी विभाग

बुधवार, १५ ऑगस्ट २०१८ । पुणे

### विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांच्या योगदानाचे स्मरण करावे

#### डॉ. एस. बी. पाटील : हुतात्मा राजगुरू विद्यालयात चर्चासत्र संपन्न



। खेड : प्रतिनिधी

देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण ठेवून विद्यार्थ्यांनी राष्ट्राभिमानाला प्राधान्य द्यावे. देशाला भूषण वाटेल अशा प्रकारचे काम करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्याबद्दलची जागरूकता समजून घेण्यासाठी मराठी विभागाने दि. ११ ते १४ ऑगस्टदरम्यान 'स्वातंत्र्य अन् जबाबदारी' या विषयावर चर्चासत्र, 'देशाचे भवितव्य' या विषयावर परिसंवाद, 'माझा देश - माझे मत' व 'जरा याद करो कुर्बानी' या विषयांवर निबंध स्पर्धेचे आयोजन केले. या उपक्रमांत सुमारे २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. 'स्वातंत्र्य अन् जबाबदारी' या विषयावरील चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी आपली जात, धर्म, भाषेपेक्षा राष्ट्राभिमान मोठा असल्याचे सांगून स्वातंत्र्यामुळे मिळालेले हक्क व कर्तव्यांची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे काम करणे म्हणजे देशभक्ती असल्याची भावना व्यक्त केली. 'भारताचे भवितव्य' या विषयावरील परिसंवादात ग्रामीण अर्थव्यवस्था, कृषिक्षेत्र, आरोग्यक्षेत्र व विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती याविषयी विद्यार्थ्यांनी मते मांडली. या चर्चेत प्रतीक्षा वांगर, निशिगंधा पवळे, सिद्धेश जाधव, शुभांगी कोरडे, पूजा धोत्रे, हर्षदा रळे, माधुरी इष्टे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

निबंध स्पर्धेत शीतल रौंधळ, वर्षा कंद, सचिन कारले यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी संयोजन केले.

पुढारी | पुणे, शनिवार १८ ऑगस्ट २०१८



समाजासाठी उपयुक्त कामे करण्याचा संकल्प करताना विद्यार्थी.

### देशाला अभिमान वाटेल असे काम करा : डॉ. पाटील

राजगुरुनगर : विद्यार्थ्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान दिलेल्या क्रांतिकारकांचा आदर्श ठेवून देशाला भूषण वाटेल असे काम करावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त मराठी विभागाच्या वतीने ११ ते १४ ऑगस्टदरम्यान विविध उपक्रम पार पडले. या वेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक आणि विद्यार्थी उपस्थित होते. स्वातंत्र्य अन् जबाबदारी या विषयावर चर्चासत्र, देशाचे भवितव्य या विषयावर परिसंवाद, माझा देश-माझे मत व जरा याद करो कुर्बानी या विषयांवर निबंध स्पर्धा आदी उपक्रम यावेळी पार पडले.

केसरी पुणे, १८ ऑगस्ट २०१८

# विद्यार्थ्यांनी राष्ट्राभिमानाला प्राधान्य देण्याची गरज : डॉ. एस. बी. पाटील



**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारकांनी जे योगदान दिले त्याचे स्मरण ठेऊन विद्यार्थ्यांनी राष्ट्राभिमानाला प्राधान्य देऊन देशाला भूषण वाटेल अशा प्रकारचे काम करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक आणि प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्याबद्दलची जागरूकता आणि ते देशाच्या भवितव्याचा करत असलेला विचार समजून घेण्यासाठी मराठी विभागाने दि.११ ते १४ ऑगस्ट दरम्यान स्वातंत्र्य अन जबाबदारी या विषयावर चर्चासत्र, देशाचे भवितव्य या विषयावर परिसंवाद, माझा देश -माझे मत व जरा याद करो कुर्बानी या विषयांवर निबंधस्पर्धेचे आयोजन केले. या सर्व उपक्रमांत प्रथम वर्ष कला व वाणिज्य तसेच द्वितीय वर्ष कला शाखेतील मराठी विषयाचा विशेषस्तरावर अभ्यास करणाऱ्या सुमारे २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्वातंत्र्य अन जबाबदारी या विषयावरील चर्चासत्रात बोलताना विद्यार्थ्यांनी आपली जात, धर्म, भाषेपेक्षा राष्ट्राभिमान मोठा असल्याचे सांगून स्वातंत्र्यामुळे मिळालेले हक्क व कर्तव्याची जाणीव ठेऊन आपले काम प्रामाणिकपणे करणे म्हणजे देशभक्ती असल्याची भावना व्यक्त केली.

भारताचे भवितव्य या विषयावरील परिसंवादात ग्रामीण अर्थव्यवस्था, कृषिक्षेत्र, आरोग्यक्षेत्र व विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती या विषयी विद्यार्थ्यांनी मते मांडली. उर्जा क्षेत्रातील भवितव्याविषयी चर्चा करताना समांतर उर्जेचे स्त्रोत शोधण्याची गरज व्यक्त केली. एक देश एक करप्रणाली लागू होणे, रुपयाचे अवमूल्यन रोखण्यासाठी निर्यात वाढविणे, समाजात अर्थसाक्षरता वाढण्यासंदर्भात मते विद्यार्थ्यांनी मांडली. या चर्चेत प्रतिक्षा बांगर, निशिगंधा पवळे, सिध्देश जाधव, शुभांगी कोरडे, पूजा धोत्रे, हर्षदा राळे, माधुरी इष्टे आदि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक शितल रौंधळ, द्वितीय क्रमांक वर्षा कंद, तृतीय क्रमांक सचिन कारले यांचे आले. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याने समाजाला उपयुक्त ठरेल असे एक काम स्वच्छेने व स्वखर्चाने करण्याची प्रतिज्ञा केली. या सर्व उपक्रमांचे आयोजन उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख